# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. सिकंदर हुसेन शिदलाळे यांनी **"दक्षिण भारत जैन सभेने चालविलेल्या विद्यार्थी वस्तीगृहाचा विकास"** या विषयावरील शोधनिबंधाचे संशोधनकार्य माझ्या मार्गदर्शनाखाली केले असून ते समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

हा शोध निबंध स्वतंत्ररित्या लिहिलेला असून यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात, अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरचा शोध निबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (इतिहास) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 30/6/2006

PPatil

डॉ.सौ. पद्मजा आ. पाटील

मार्गदर्शक

# प्रतिज्ञापत्र

**''दक्षिण भारत जैन सभेने चालविलेल्या विद्यार्थी वस्तीगृहाचा विकास''** या विषयावरील सदरचा शोध निबंध मी शिवाजी विद्यापीठ एम. फिल. (इतिहास) पदवी परीक्षेसाठी लिहिलेला आहे.

हा शोध निबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही वा कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 30/6/2006

श्री. सिकंदर हुसेन शिदलाळे
संशोधक

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# ऋणनिर्देश

संशोधन करण्यासाठी अनेक व्यक्ती, संस्था यांनी मला बहुमोल सहकार्य केले आहे त्याचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

माझ्या संशोधन मार्गदर्शिका आदरणीय डॉसौ. पद्मजा ए. पाटील यांनी वेळोवेळी केलेल्या अमुल्य सुचना, त्यांच्या सोबतच्या दिर्घ चर्चा, हातचे काहीही न राखता केलेले मार्गदर्शन व सतत प्रोत्साहन देण्याची वृत्ती यामुळेच मी संशोधन करु शकलो. म्हणून त्यांचे आभार न मानता त्यांच्या ऋणात रहाणे पसंत करतो.

सतत प्रेरणा करणारे व नेहमी मार्गदर्शन करणारे इतिहास विभाग प्रमुख डॉ. अरुण भोसले, मराठा संशोधन केंद्राचे समन्वयक प्रा. एम.ए. लोहार तसेच डॉ. एम.पी. पाटील, डॉ. नंदा पारेकर, श्री. अवनिश पाटील, डॉ. कविता पाटील या सर्व गुरुजनांचे आभार; इतिहास विभागाचे क्लार्क श्री. उदय खेडकर व शिपाई श्री. सुनिल लोंढे यांनी वेळोवेळी केलेल्या मदतीबद्दल आभार.

दुर्मिळ संदर्भ साधनांची उपलब्धता करुन देणाऱ्या संस्थांचा उल्लेख करणे महत्वाचे आहे यामध्ये कोल्हापूर पुराभी लेखागाराचे प्रमुख श्री. भोसले साहेब, श्री. कुंडले, श्री. आवळे, श्री. वाघमारे, प्रशांत, संदीप या सर्वांच्या सहकार्यामुळे अनेक मुळ साधने प्राप्त झाली तसेच शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, पुरातत्व विभागातील दुर्मिळ ग्रंथ व उपलब्ध करुन देणारे डॉ. बापूसाहेब माने यांच्या सहकार्याबद्दल आभार.

दक्षिण भारत जैन सभेचे मध्यवर्ती ग्रंथालय, सांगली की ज्यामध्ये प्रगती आणि जिनविजयचे अंक, दक्षिण भारत जैन सभेचे अहवाल, बा.भु. पाटील ग्रंथ प्रकाशन मंडळ यांचे ग्रंथालय, दक्षिण भारत जैन सभेचे विशेषांक व स्मरणिका, दिगंबर जैन बोर्डीग कोल्हापूर ग्रंथालय, माणिकबाग दिगंबर जैन बोर्डींग ग्रंथालय, हुबळी जैन बोर्डीग ग्रंथालय, सांगली जैन बोर्डींग ग्रंथालय येथील ग्रंथपाल यांनी महत्वपूर्ण संदर्भ साधने पुरविल्याबद्दल आभार.

मुलाखती व्दारे उपयुक्त माहिती देणारे मा.प्रा. डी.ए. पाटील, चेअरमन दक्षिण भारत जैन सभा तसेच श्री. धनपाल हेरवाडे (मामा), श्री. आप्पासाहेब गाजी, श्री. नेमीनाथ खोत, श्री. अनिल शेगुणसे, श्री. महेश उपाध्ये, श्री. शामकांत पाटील, श्री. ए.जी. कुसनाळे, श्री.

एस.एम. पाटील, श्री. नागराळे तसेच सौ. सुमन चौधरी, सौ. सरोजनी इचलकरंजे, रत्नमाला दुग्गे, सौ. दिप्ती चौधरी या सर्वांचा मला बहुमोल सहकार्य लाभलेले आहे या बद्दल सर्वांचे आभार.

माझे आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकी, मावशी त्याबरोबरच घरातील लहान भांवडे यांनी सहकार्य केले. संशोधनासाठी आवश्यक ते मानसिक वातावरण निर्माण करणारे माझे काका श्री. नुरअहमद महम्मद शिदलाळे व माझी आत्या सौ. अमीना महमद शिदलाळे यांनी दिलेले सहकार्य विसरता येणार नाही.

श्री. शिदलाळे सिकंदर हुसेन

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | ऐतिहासिक परंपरा व दक्षिण भारत जैन सभेची स्थापना | १ ते २१ |
| प्रकरण दुसरे | वस्तीगृहाची स्थापना, विकास व वाढ | २२ ते ६१ |
| प्रकरण तिसरे | श्राविकाश्रमाची स्थापना, विकास व वाढ | ६२ ते ९० |
| प्रकरण चौथे | वस्तीगृहाचे व्यवस्थापन, अर्थव्यवस्था, शिष्यवृत्ती, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम | ९१ ते १४१ |
| प्रकरण पाचवे | उपसंहार | १४२ ते १५३ |
| | संदर्भ ग्रंथसूची | १५४ ते १५७ |

# प्रस्तावना

कोल्हापूर हे वसतीगृहांचे शहर मानले जाते. छ. शाहू यांनी कोल्हापूरमध्ये प्रत्येक जाती व जमातीसाठी वसतिगृहाची स्थापना केली होती. छ. शाहू महाराजांच्या काळात २३ वसतीगृहाची स्थापना १९०१ ते १९२२ या काळात झाली. या वसतीगृहाद्वारे ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरात राहून शिक्षण घेण्याची सोय झाली. इ.स.१८९७ साली छ. शाहूंनी सर्व जातीधर्माच्या मुलांसाठी राजाराम कॉलेजला जोडलेले वसतिगृह फारसा यशस्वी झाला नाही. कारण तेथे ब्राह्मणांखेरीज एकही विद्यार्थी राहण्यास आला नाही. त्यामुळे सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी वसतीगृहे सुरू करणे त्यासाठी सामाजिक व आर्थिक मदत करणे हा नवीन प्रयोग छ. शाहूंनी केला.

इ.स. १८९९ ला जैन समाजाने 'दक्षिण महाराष्ट्र जैन सभा' स्थापन केली या संस्थेची उद्दिष्ट्ये जैन समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक विकास करणे हे होते. या संस्थेने गरीब मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी श्रीमंताकडून शिक्षणफंड जमा केले. कोल्हापूरात पहिले जैन वसतीगृह स्थापन करण्यासाठी छ. शाहूंनी चौफाळ्याचा माळा ही जागा दिली आणि आर्थिक मदत केली. (१९०२) यानंतर जैन स्त्रियांच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी १९०८ ला पहिले जैन श्राविकाश्रम कोल्हापुरात स्थापन करण्यात आले.

दक्षिण भारत जैन सभेने द भारत जैन सभेने कोल्हापूर बोर्डिंगची सुरुवात १९०५ मध्ये केली. त्यानंतर दिगंबर जैन बोर्डिंग हुबळी (१९०९), माणिक बाग दिगंबर जैन बोर्डिंग बेळगाव (१९१५), रा. ध. दावडा दिगंबर जैन बोर्डिंग सांगली (१९२२), दिगंबर जैन बोर्डिंग इचलकरंजी (१९८६) अशी विद्यार्थी वस्तीगृहाची एक मालिकाच २० व्या शतकात सुरू केली. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षण देण्याची गरज ओळखून महिलाश्रम काढण्याची

अभिनव योजना द. भा. जैन सभेने १९०८ पासून सुरू केली. या महिलाश्रमाच्या मालिकेत जैन श्राविकाश्रम कोल्हापूर (१९०८), श्रीमंतबाई कळंत्रे श्राविकाश्रम सांगली (१९२२), स्व. सौ. सुमनबाई सदलगे जैन श्राविकाश्रम कागल (२०००) या वस्तीगृहाची सुरुवात केली आहे. या विषयासाठी सर्वप्राथमिक संदर्भ साधने म्हणून दक्षिण भारत जैन सभा (प्रोसेडिंग्ज, दक्षिण भारत जैन सभेचे मुखपत्र प्रगती आणि जिनविजय चे उपलब्ध अंक, दक्षिण भारत जैन सभेचे चेअरमन यांचे वेळोवेळी प्रसिद्ध केलेले अहवाल व वसतिगृहांनी आपआपल्या विशिष्ट कार्यक्रमाच्यावेळी प्रसिद्ध केलेल्या स्मरणिका या महाराष्ट्रातील मराठीमध्ये; कर्नाटकातील कानडीमध्ये उपलब्ध आहेत. कोल्हापूर पुराभीलेखागारातील कोल्हापूर स्टेट ॲडमिनस्ट्रेटीव्ह, ठराव बुक्स, कोल्हापूर स्टेट गॅझेट यांचा वापर केला आहे. या संशोधनासाठी मुख्यत: मौखिक इतिहास पद्धतीचा वापर केला आहे. त्यामध्ये सर्व बोर्डींग हौसेसचे पदाधिकारी विद्यार्थी व दक्षिण भारत जैन सभेचे पदाधिकारी लिखित स्वरूपात प्रश्नावली देऊन घेतले आहेत.

संशोधनाचा मूळ गाभा ऐतिहासिक संशोधन पद्धती व सर्वेक्षण, माहितीचे संकलन, वर्गीकरण, अहवाल, लेखन इत्यादीवर भर देतो तसेच वर्तमान व भविष्यकालीन संदर्भात निष्कर्ष सादर करण्यासाठी परिपूर्ण प्रयत्न केला गेलेला आहे. अशाप्रकारे प्रस्तूत शोध निबंधात दक्षिण भारत जैन सभा व जैन वसतिगृहाचा विकास व कार्य यावर ऐतिहासिक दृष्टीकोनातून प्रकाश टाकण्यात आलेला आहे.